हवामान आधारीत कृषि सल्ला
ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

७७) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २३.११.२०२६

जिल्हा : नंदुरबार

मागील आठवड्यातील हवामान (१६/११/२०२६ ते २२/११/२०२६)							हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२४/११/२०२६ ते २८/११/२०२६)				
१६	१७	१८	१९	२०	२१	२२	<दिनांक>	२४	२५	२६	२७	२८
							पाऊस (मिमी)	०	०	०	०	०
							कमाल तापमान (अंसे)	३१	३२	३१	३०	३०
							किमान तापमान (अंसे)	१६	१५	१४	१३	१४
							ढग स्थिती (आकाश)	०	०	१	१	३
							सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	६१	५६	५५	५४	५७
							दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	२८	२३	२१	२०	२४
							वाऱ्याचा वेग (किमी/ तास)	९	७	६	४	७

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश		प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. तसेच किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.
सामान्य सल्ला		१) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानाच्या पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. २) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. ३) शेतकऱ्यांना आवश्यक ती कृषी विषयक माहिती, हवामान अंदाज, बाजारभाव, कीड-रोग ओळख व नियंत्रण उपाय, हवामान आधारित कृषि सल्ला, गोदामे व कृषी यंत्रसामग्री भाडे केंद्र यांची माहितीकरीता महाविस्तार ऍपचा वापर करावा. ४) पशुधनातील उष्णता व पर्यावरणीय ताण व्यवस्थापनासाठी तसेच तापमान व आर्द्रतेवर आधारित Temperature Humidity Index मोजून जनावरांची स्थिती (सामान्य, इशारा, धोका, आणीबाणी) आणि त्यानुसार त्वरित मार्गदर्शन तसेच जनावरांच्या संतुलित आहाराची माहिती मिळविण्याकरिता फुले अमृतकाल मोबाईल ॲपचा वापर करावा.
संदेश		**ज्वारी:** पेरणीनंतर ३ आठवडयांने फटीच्या कोळप्याने पहिली कोळपणी करावी. खोडकिडा प्रादुर्भाव दिसल्यास क्युनॉलफॉस २५ ईसी ७५० मीली प्रवाही ५०० लीटर पाणी प्रती हेक्टरी फवारणी करावी. आवश्यकतेनुसार पहिली खुरपणी करावी. पेरणीनंतर ५ आठवडयांने पासेच्या कोळप्याने दुसरी कोळपणी करावी आणि गरज असल्यास पहिले संरक्षित पाणी दयावे.
गहू	**पेरणी**	बागायती गव्हाची वेळेवर पेरणीची योग्य वेळ म्हणजे नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा होय. या कालावधीत पेरणी केल्यास गव्हाचे उत्पादन चांगले येते. बागायती गव्हाची पेरणीसुध्दा उशिरा करता येते. बागायती गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबरनंतर उशिरा केल्यास प्रत्येक पंधरवाड्यास हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादन कमी येते व त्यामुळे १५ डिसेंबर नंतर पेरलेले गव्हाचे पीक फायदेशीर ठरत नाही.
हरभरा	**रोप अवस्था**	पेरणीनंतर ८ ते १० दिवसांनी तुटाळी आढळून आल्यास बी टोकून नांग्या भरून घ्याव्यात. जमिनीत पडणाऱ्या भेगातून पाण्याचे बाष्पीभवन होते. जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी व हवा खेळती राहण्यासाठी तसेच, तणांचे नियंत्रण करण्यासाठी पेरणीनंतर २० दिवसांनी शेतात कोळपणी करून घ्यावी.
रब्बी मका	**रोप अवस्था**	रब्बी हंगामात ८ ते १० दिवसात होते. पीक उगवत असताना पक्षी कोवळे कोंब उचलतात परिणामी रोपांची संख्या कमी होऊन उत्पादन घटते म्हणून पेरणीनंतर सुरवातीच्या १०-१२ दिवसापर्यंत पक्ष्यांपासून राखण करणे अत्यंत महत्वाचे आहे तसेच पीक दुधाळ असताना पक्षी कणसे फोडून दाणे खातात म्हणून अशावेळी देखील पक्षी राखण आवश्यक असते. मका उगवणीनंतर ८-१० दिवसांनी विरळणी करुन एका चौफुल्यावर एकच जोमदार रोप ठेऊन विरळणी करावी. गरज भासल्यास पीक उगवणीनंतर त्वरीत नांग्या भराव्यात. तणनियंत्रणासाठी अँट्राझीन ५० टक्के ०.८ ते १.० किलो पेरणी संपताच २०० लिटर पाण्यात किंवा ४ ते ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून समप्रमाणात जमिनीवर फवारावे. तसेच तणांच्या

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

		प्रादुर्भावानुसार मका वाढीच्या सुरवातीच्या काळात एक ते दोन खुरपण्या करुन गरजेनुसार एक ते दोन कोळपण्या कराव्यात.
करडई	**पिकाची वाढ होण्याची अवस्था**	रब्बी हंगामात गरज असल्यास एखादी खुरपणी करावी. दोन ते तीन कोळप्याच्या पाळ्या देणे अतिशय गरजेचे आहे. पहिली कोळपणी ३ ऱ्या आठवड्यात फटीच्या कोळप्याने, दुसरी कोळपणी आठवड्यात अखंड पासाच्या कोळप्याने व तिसरी कोळपणी ८ व्या आठवड्यात दातेरी कोळप्याने करावी.
बटाटा	**पेरणीपूर्व तयारी**	रब्बी हंगामासाठी बटाटा या पिकांच्या लागवडीकरीता कुफरी ज्योती, कुफरी लवकर, कुफरी सिंधुरी, कुफरी सूर्या, कुफरी पुखराज ई.जातींचा वापर करावा.
चारा पिके		जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा उपयोग करून चाऱ्यासाठी रब्बी ज्वारीची पेरणी करावी. मका पीक उपलब्ध असलेल्या ठिकाणी मक्यापासून मुरघास तयार करून साठवून ठेवावा. अतिरिक्त हिरवा चारा चांगल्या प्रकारे वाळवून त्याचे पुढील आपत्कालीन परिस्थितीत वापर करावा. पावसाचे प्रमाण कमी असतानाही चांगली वाढणारी आणि प्रतिकूल परिस्थितीत तग धरू शकणारी चारा पिके, जसे की संकरीत नेपिअर, दशरथ आणि स्टायलो, यांची लागवड करावी.
पशुधन	**जनावरांची हिवाळ्यात घ्यावयाची काळजी**	थंडी हा ऋतू आरोग्यदायक असला तरी लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेले जनावरांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनावरांच्या गोठ्यांना बारदान/ शेडनेटचे पडदे लावावेत. तसेच गोठ्यामधील उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० व्हॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावीत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोट्या जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा. थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषत: गाभण गायी-म्हशींची जास्त काळजी घ्यावी. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे, जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत. सर्दीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास जनावरांच्या नाकाभोवती टरपेंटाईनचा बोळा फिरवावा. सर्दीचा रंग हिरवट-पिवळसर असल्यास तातडीने पशुवैद्यकाच्या सल्ला घ्यावा. जनावरांचे पिण्याचे पाणी अतिथंड नसावे. जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. जनावरांना लाळ्या-खुरकुज आजारापासून संरक्षणासाठी लसीकरण करावे.
कुक्कुटपालन		पोल्ट्री पक्ष्यांचे थंडीपासून बचावासाठी पोल्ट्री शेड मधील तापमान रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी उबदार राहील याची काळजी घ्यावी.
आच्छादनाचा वापर		१) आच्छादनामुळे जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते. २) आच्छादनासाठी काडी कचरा,उसाचे पाचट,तुरकाटया,ज्वारीची धसकटे,वाळलेले गवत इ. उपलब्ध सेंद्रीय पीक अवशेष,जमिनीच्या पृष्ठभागावर आच्छादन करण्यास उपयुक्ता आहेत. ३) बाष्पीभवनामुळे जमिनीतील सुमारे ७० टक्के ओल उडून जाते. ती थोपवून धरण्यासाठी शेतातील निरुपयोगी काडी कचरा,धसकटे,गवत,तुरकाडयाचा वापर पीक उगवणीनंतर १५ दिवसांचे आत पिकाच्या दोन ओळीत जमिनीवर हेक्टरी ५ टन पसरावे. यामुळे २५ ते ३० मि.मि. ओलाव्याची बचत होते आणि उत्पादनात ३० ते ४० टक्यांनी वाढ होते.

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : कृषि महाविद्यालय, धुळे.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २३.११.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा
प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.